# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 15 December 2024

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १५ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- आपल्या कार्यकाळातल्या घटना दुरुस्त्या समाजातल्या वंचिताच्या हितासाठी – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- 'एक देश-एक निवडणूक'शी संबंधित दोन विधेयकं उद्या लोकसभेत सादर होणार
- राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपुरात आज मंत्रिमंडळाचा विस्तार
- अविष्कार २०२४ च्या विद्यापीठस्तरीय फेरीत पावणे दोनशे प्रकल्पांचं सादरीकरण
- जालना-सिंदखेडराजा मार्गावर आयशर ट्रक आणि बसच्या अपघातात चार प्रवाशांचा मृत्यू

आणि

- बॉर्डर –गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेत तिसऱ्या सामन्याचा पहिला दिवस पावसामुळे वाया

आपल्या कार्यकाळातल्या घटना दुरुस्त्या समाजातल्या वंचिताच्या हितासाठी केल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राज्यघटना स्वीकृतीच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकसभेत संविधानावर झालेल्या विशेष चर्चेच्या उत्तरात ते काल बोलत होते. काँग्रेसने संविधानाचा सातत्याने अवमान केला, तसंच राजकीय स्वार्थासाठी संविधानाचा वापर केल्याचं नमूद करत, काँग्रेसच्या कार्यकाळात ६५

वेळा घटना दुरुस्ती करण्यात आल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं. आणिबाणीसह अनेक घटनांचा त्यांनी यावेळेस उल्लेख केला. आपल्या कार्यकाळात मात्र इतर मागास वर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा, गरीब घटकांना दहा टक्के आरक्षण, महिला आरक्षण, काश्मीरातून कलम ३७० हटवणं यासह समाजाच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी घटनादुरुस्ती केल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले...

**"हमने भी संविधान संशोधन किए है देश की एकता के लिए देश के उज्वल भविष्य के लिए आज संविधान की भावना के प्रति पूर्ण समर्पण के साथ किए है हमने जो संविधान संशोधन किए है वह पुराणी गलतियों को ठीक करने के लिए किए है और हमने एक उज्वल भविष्य का रास्ता मजबूत करने के लिए किए है और समय की कसौटी पर हम खरे उतरेंगे क्यूंकि सबके स्वास्थ के लिए किया गया पाप नहीं है देश हित में किया गया पुण्य है"**

कर्तव्य पालन, सबका साथ सबका विकास, भ्रष्टाचाराचं संपूर्ण निर्मूलन, कायदे परंपरांचं पालन, आदी ११ संकल्प पंतप्रधानांनी यावेळी सदनासमोर मांडून आपल्या भाषणाचा समारोप केला.

****

त्यापूर्वी संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजेजू यांनी काल सकाळी या चर्चेला प्रारंभ केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. अनेक नेत्यांनी या चर्चेत सहभाग घेत, आपली मतं मांडली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सत्तारूढ पक्षावर संविधान कमकुवत करण्याचा आरोप केला. विद्यमान सरकारच्या काळात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समानता नष्ट झाल्याचा आरोप गांधी यांनी केला.

****

'एक देश–एक निवडणूक'शी संबंधित दोन विधेयकं लोकसभेत उद्या सोमवारी सादर केली जाणार आहेत. संविधान सुधारणा विधेयक तसंच केंद्रशासित प्रदेश कायदा सुधारणा ही दोन विधेयकं, केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल लोकसभेत मांडतील. 'एक देश – एक निवडणूक' या संकल्पनेची पडताळणी करण्यासाठी

स्थापन करण्यात आलेल्या, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने, निवडणूक प्रक्रिया दोन टप्प्यात राबवण्याची शिफारस केली आहे. पहिल्या टप्प्यात लोकसभेची निवडणूक आणि सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका, तर दुसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात, असं या शिफारशींमध्ये म्हटलं आहे.

****

राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे. नागपूर इथं राजभवनात सायंकाळी चार वाजता हा शपथग्रहण समारोह होईल. राजभवनातून ही माहिती देण्यात आली. दरम्यान, मंत्र्यांची यादी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवण्यात आली असून, तिथून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आमदारांना सूचित केलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तारणमुक्त कृषी कर्जाची मर्यादा एक लाख साठ हजारांवरून दोन लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या एक जानेवारीपासून होणार आहे. शेतकऱ्यांना अधिक चांगली वित्तीय सुविधा पुरवणं हा यामागील उद्देश आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं दिलेल्या एका निवेदनात सांगितलं आहे.

****

या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत..

****

युवकांच्या कल्पनाशक्तीला वाव देणाऱ्या आविष्कार २०२४ या महोत्सवाची विभागीय फेरी काल डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पार पडली. कोल्हापूर इथल्या डी वाय पाटील विद्यापीठाचे संशोधन-संचालक तथा अधिष्ठाता डॉक्टर सी. डी. लोखंडे यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन झालं. या आविष्कार

महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून –१२५, जालना–२५, बीड–४५, तर धाराशिव जिल्ह्यातून –६२ असे २४८ संशोधक विद्यार्थी सहभागी झाले. विविध शाखांमधून १७५ प्रकल्प या फेरीत सादर झाले असून, विद्यापीठस्तरीय अंतिम फेरी आज होणार आहे.

****

मुंबई इथं डॉ. होमी भाभा विद्यापीठात झालेल्या, "नॅशनल कॉन्फरन्स ऑन डेटा सायन्स फॉर क्लायमेट रेसिलेन्स" या राष्ट्रीय परिषदेत, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठानं उल्लेखनीय यश संपादन केलं आहे. या परिषदेत कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयातले, विशाल काळबांडे यांनी सादर केलेल्या शोधनिबंधाला, प्रथम क्रमांकाने गौरवण्यात आलं. तसंच तनुजा वाघ, किंजल मोरे, सुजय किंगे, नयन लोनगाडगे, प्रियंका बोरसे, सक्षम पंडितकर, आणि काजल कुमारी या विद्यार्थ्यांनीही उच्च दर्जाचे संशोधन शोधनिबंध सादर केले. या सर्व विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांच्याहस्ते गौरव करण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागात कार्यरत प्राध्यापक डॉ. योगेश राजेंद्र यांना त्यांच्या संशोधनासाठी पेटंट मिळालं आहे. डॉ राजेंद्र यांनी रुग्ण, वयोवृद्ध, बालक, तसंच पाळीव प्राण्यांच्या दैनंदिन वागणुकीवर लक्ष ठेवून, त्यांना त्याप्रमाणे मदत करण्यासाठी तसंच त्यांची काळजी घेण्यासाठीचं एक उपकरण विकसित केलं आहे. या यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

****

अंबाजोगाई इथं ११ व्या साहित्य संमेलनाला कालपासून प्रारंभ झाला. डॉ. शिरीष खेडगीकर यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन झालं. संमेलनाध्यक्ष बालाजी सुतार, स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. माजी स्वागताध्यक्ष डॉ. बी. आय. खडकभावी यांच्या हस्ते जागर दिंडीचं उद्घाटन

झालं. ही जागर दिंडी मुकुंदराज सभागृहात पोहोचताच, सहभागी विद्यार्थ्यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांचा पुष्प देऊन सन्मान केला.

“संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात कवयित्री रचना यांना डॉ शैला लोहिया लेखिका पुरस्कार, उमेश मोहिते यांना मंदाताई देशमुख कथा लेखन पुरस्कार तर अलीम अजीम यांना प्राचार्य संतोष मुळावकर शिक्षक लेखक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

या प्रसंगी बोलताना डॉ. शिरीष खेडगीकर यांनी लोकाश्रयातून साहित्य संमेलन भरवणं ही  आशादायक गोष्ट असल्याचं सांगत, संमेलन इव्हेंट नव्हे तर मुव्हमेन्ट व्हावं, अशी अपेक्षा व्यक्त केली. संमेलनाध्यक्ष बालाजी सुतार यांनी अंबाजोगाई इथं आद्यकवी मुकुंदराजांपासून प्रा. शैला लोहिया यांच्यापर्यंत मान्यवरांनी साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करत, या माध्यमातून पुढच्या पिढ्यांवर कला-साहित्य-संगीताचे संस्कार झाल्याचं मत व्यक्त केलं.”

या संमेलनात आज, नव्या शैक्षणिक धोरणात भाषा शिक्षण, या विषयासह, संमेलनाध्यक्ष बालाजी सुतार यांच्या साहित्यावर परिसंवाद, दुपारच्या सत्रात कथाकथन तर सायंकाळी चार वाजता समारोप सोहळा होणार आहे.

****

जालना-सिंदखेडराजा मार्गावर आयशर ट्रक आणि बसची समोरासमोर धडक होऊन चार प्रवाशांचा मृत्यू झाला, तर १८ ते २० प्रवासी जखमी झाले. नाशिक-नांदगाव डेपोची ही बस जालन्याहून सिंदखेडराजाकडे जात असताना, नाव्हा शिवारात ही दुर्घटना घडली. जखमींना उपचारासाठी जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

****

**क्रिकेट**

बॉर्डर – गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्याचा आज दुसरा दिवस आहे. ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरू झालेल्या या सामन्यात भारतानं काल नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेत, यजमान संघाला फलंदाजीसाठी पाचारण केलं. ऑस्ट्रेलियाच्या बिनबाद २८ धावा झाल्या असतांनाच पाऊस आल्यानं, खेळ थांबवावा लागला, तो दिवसभरात पुन्हा सुरू होऊ शकला नाही. मालिकेत दोन्ही संघ एक एक सामना जिंकून बरोबरीत आहेत.

****

परभणी इथं घडलेल्या अप्रिय घटनेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल या ठिकाणाची पाहणी केली. या हिंसाचाराची सीबीआय चौकशी करावी अशी मागणी आठवले यांनी केली. शहरात झालेल्या तोडफोड प्रकरणी पोलिसांकडून राबवली जात असलेली कारवाई थांबवण्याबाबत मुख्यमंत्र्यांसोबत बोलणं झाल्याचं त्यांनी सांगितलं. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्याशी चर्चा करून, भीमनगर मधल्या नागरिकांची भेट घेऊन आठवले यांनी संवाद साधला.

****

दत्तजयंती काल ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरी झाली. माहूर इथल्या दत्तशिखरासह औदुंबर, गाणगापूर, नृसिंहवाडी, या प्रमुख स्थानांसह विविध दत्त मंदिरात काकड आरती, मंगलआरती, अभिषेक, महापूजा, नैवेद्य, महाआरती, महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

****

धाराशिव जिल्ह्यात रब्बी हंगामात आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेडमार्फत तालुकानिहाय २१ केंद्रावर मूग, उडीद आणि सोयाबीन या पिकाची ऑनलाईन शेतकरी नोंदणीस एक ऑक्टोबरपासून सुरूवात झाली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या खरेदी केंद्रावर स्वत: जावून ऑनलाईन नोंदणी करण्याचं आवाहन धाराशिव जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी केलं आहे.

****

मानसिक आजाराचं वेळेत निदान झाल्यास आणि नियमित औषधोपचार, समतोल आहार घेतल्यास मानसिक आजार पूर्णपणे बरे होण्यास मदत होते, असं मनोविकार तज्ञ डॉ. महेश कानडे यांनी म्हटलं आहे. धाराशिव जिल्ह्यात तेरखेडा इथं सर्व रोग निदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते काल बोलत होते.

****